महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, मुंबई
फोन : २४०७७४४१ फॅक्स : २४०२५७६३

**साप्रवि/रवका/न.क्र.५/३१२५२** **दिनांक ०६.०८.२००८**

प्रति,
**मुख्य अभियंता,**
परिमंडल कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.मर्यादीत,
अकोला/औरंगाबाद/कल्याण/कोल्हापूर/लातूर/नागपूर/
नाशिक/पुणे/रत्नागिरी/भांडूप शहर/नागपूर शहर

विषय : प्रशासकीय परिपत्रक क्र.१६३ दि.०४.०८.२००८ नुसार लागू केलेल्या 'Early retirement Scheme for Line Staff' या योजनेचा मराठी अनुवाद.

.....

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की महावितरण कंपनीने वय वर्षे ४५ व त्यावरील वयाच्या व शारीरिकदृष्टया नेहमीची कामे/जबाबदारी पार पाडण्यास अपात्र असणाऱ्या तारमार्ग कर्मचाऱ्यांसाठी नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्ती योजना प्रशासकीय परिपत्रक क्र.१६३ दि.०४.०८.२००८ अन्वये कार्यान्वित केली आहे.

२. सदर योजनेची माहिती सर्व तारमार्ग कर्मचाऱ्यांना व्हावी व या योजनेचा लाभ जे कर्मचारी आपली नियमित कामे पार पाडण्यास शारीरिकदृष्टया अपात्र आहेत त्यांना मिळावा या उद्देशाने सदर योजनेचा मराठी अनुवाद करून या पत्रासोबत पाठवित आहे. आपणास विनंती करण्यात येते की ही योजना कंपनीतील सर्व तारमार्ग कर्मचाऱ्यांपर्यंत पोहचेल अशी व्यवस्था करण्यात यावी व या योजनेस मोठया प्रमाणात प्रसिद्धी द्यावी, जेणेकरून शारीरिकदृष्टया अपात्र असलेल्या जास्तीत जास्त तारमार्ग कर्मचाऱ्यांना सदर योजनेचा लाभ घेता येईल.

३. सदर योजनेतील नियम तथा अटीबाबत काही वाद निर्माण झाल्यास किंवा स्पष्टीकरणाबाबत संदिग्धता आढळून आल्यास मूळ इंग्रजी आवृत्ती मधील बाबी ग्राहय धरण्यात येतील.

सोबत : वरीलप्रमाणे

**मुख्य महाव्यवस्थापक (क)**

प्रत रवाना :

प्रेषण यादीप्रमाणे - उप विभागीय व त्यावरील सर्व प्रशासकीय कार्यालय प्रमुख

क्र.साप्रवि/रवका/न.क्र. ५/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
*मुंबई - ४०० ०१९.*

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

## प्रशासकीय परिपत्रक क्र. १६३, दिनांक ०४/०८/२००८

विषय : वय वर्षे ४५ आणि त्यावरील वयाच्या तारमार्ग कर्मचाऱ्यांसाठी नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्ती योजना

......

वीज क्षेत्रात निर्माण झालेली स्पर्धात्मक परिस्थिती आणि उपभोक्त्यास समाधानकारक सेवा देण्यासाठी तरुण व वृद्ध कर्मचारी यांच्यात सामंजस्य राखून एकूण कार्यक्षमतेत सुधारणा करण्याच्या दृष्टिकोनातून सर्वसाधारण तांत्रिक कामे योग्य रितीने न करू शकणाऱ्या आणि शारीरिकदृष्टया अपात्र असणाऱ्या तारमार्ग कर्मचारीवृंदासाठी सदरील योजना अंमलात आणण्याचा प्रस्ताव म.रा.वि.वि.कं.म.च्या विचाराधीन होता.

२. दिनांक ८.७.२००८ च्या संचालक मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आलेल्या योजनेची वस्तुस्थिती व तपशील नमूद केलेल्या प्रस्तावावर संचालक मंडळाने विचारविनिमय केला आणि ठराव क्र.५६०, दि.८.७.२००८ अन्वये वय वर्षे ४५ आणि त्यावरील वयाच्या आणि शारीरिकदृष्टया नेहमीची कामे पार पाडण्यास अपात्र असणाऱ्या तारमार्ग कर्मचाऱ्यांसाठी "नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्ती योजना" अंमलात आणण्याचा ठराव मंजूर केला व या योजनेस मान्यता दिली.

३. "नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्ती योजना" योग्यरित्या तथा प्रभावीपणे अंमलात आणता यावी यासाठी संचालक मंडळाने व्यवस्थापकीय संचालकांना संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांच्याशी सल्लामसलत करून योजनेत सुधारणा/दुरुस्त्या/बदल करण्याचे अधिकार प्रदान केले आहेत.

४. त्यानुसार व्यवस्थापकीय संचालकांनी संचालक (संचलन) आणि संचालक (वित्त) यांच्याशी सल्लामसलत करून वय वर्षे ४५ आणि त्यावरील वयाच्या व नेहमीची कामे करण्यास शारीरिकदृष्टया अपात्र तारमार्ग कर्मचाऱ्यांसाठी "नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्ती योजना" लागू करण्यास मान्यता दिली. मान्यताप्राप्त योजनेचा तपशील या प्रशासकीय परिपत्रकाच्या जोडपत्र "क" आणि "ख" मध्ये समाविष्ट केला आहे.

५. "नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्ती योजने " चा लाभ दिनांक १५.८.२००८ ते ३०.११.२००८ या दरम्यानच्या कालावधीसाठी लागू होईल. समितीच्या कार्यवृत्तासहित परिमंडलनिहाय एकत्रित प्रस्ताव आणि "नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्ती योजना" स्विकारू इच्छिणाऱ्या कर्मचाऱ्यांचे अर्ज संबंधित मुख्य अभियंत्याने दिनांक १५.१२.२००८ पर्यंत कार्यकारी संचालक (मासं) यांचे कार्यालयास सादर करावयाचे आहेत. विहित अर्जाचा नमुनाही जोडपत्र "ग" म्हणून सोबत जोडला आहे.

६. नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्त करण्याचे व कंत्राटांतर्गत नियुक्तीचे संपूर्ण अधिकार म.रा.वि.वि.कं.म.कडे असतील व कंपनीचा निर्णय अंतिम राहील. तारमार्ग कर्मचाऱ्याने एकदा स्वीकारलेला पर्याय/विकल्प हा अखेरचा असेल व कोणत्याही परिस्थितीत तो रद्द करता येणार नाही.

७. हे प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सहपत्र : वरील प्रमाणे

सही /-
**(कर्नल राहूल गोवर्धन,** सेवानिवृत्त**)**
**कार्यकारी संचालक (मासं)**

प्रति,
म.रा.वि.वि.कं.मर्या.च्या प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना

# वय वर्षे ४५ आणि त्यावरील वयाच्या तारमार्ग कर्मचाऱ्यांसाठी नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्ती योजना

## १. योजना :

या योजनेस " वय वर्षे ४५ आणि त्यावरील वयाच्या तारमार्ग कर्मचाऱ्यांसाठी नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्ती योजना" असे संबोधण्यात येईल.

## २. योजनेची व्याप्ती :

२.१ योजनेमध्ये वितरण शाखेतील खालील तारमार्ग कर्मचारीवर्गाचा समावेश असेल

१) तारमार्ग कार्यदेशक
२) तारमार्ग निरीक्षक
३) वरिष्ठ तंत्रज्ञ
४) तंत्रज्ञ
५) कनिष्ठ तंत्रज्ञ

## ३. कार्यपद्धती :

**३.१.१** वयाची पंचेचाळीशी ओलांडलेल्या व किमान २ वर्षे सेवा शिल्लक असणाऱ्या एखाद्या तारमार्ग कर्मचाऱ्यास शारीरिक दृष्ट्या नेहमीची कामे करणे अशक्य होत असेल/शारीरिकदृष्ट्या अपात्र वाटत असल्यास तो त्याच्या शाखा कार्यालयामार्फत कार्यकारी अभियंता/अधीक्षक अभियंताच्या नावे नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्तीसाठी अर्ज करू शकेल. त्याचप्रमाणे उप विभागीय अधिकारी आणि त्यावरील स्तराच्या अधिकाऱ्यास एखादा तारमार्ग कर्मचारी त्याचे काम करण्यास शारीरिकदृष्ट्या अपात्र असल्याचे वाटत असेल तर, त्या संबंधित कर्मचाऱ्याने नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्तीसाठी विकल्प/पर्याय सादर केला नसला तरी, तो नियतकालावधीपूर्व सेवानिवृत्तीसाठी त्या कर्मचाऱ्याची शिफारस करू शकेल.

**३.१.२** कर्मचाऱ्याने नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्तीसाठी अर्ज केला असल्यास उपविभागीय अधिकारी/कार्यकारी अभियंता त्यावर विचार करतील व त्यांनी शिफारस केल्यास तो अर्ज समितीस सादर करण्यात येईल. समितीची रचना प्रत्येक परिमंडलासाठी खालीलप्रमाणे असेल.

क) अधीक्षक अभियंता (परिमंडलाच्या मुख्य अभियंत्याने नामनिर्देशित केलेला)
ख) उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी
ग) वैद्यकीय अधिकारी (एमबीबीएस/पीजी/शक्यतो शासकीय वैद्यकीय अधिकारी)

**३.१.३** कर्मचाऱ्यांच्या शारीरिक व वैद्यकीय पात्रतेचे निर्धारण समिती करील व तो अपात्र आहे असे समितीचे मत झाल्यास समिती त्यांच्या नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्तीची शिफारस करील.

४. **<u>कर्मचाऱ्यासाठी वयोमर्यादा :</u>**

४.१ नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्तीसाठी तारमार्ग कर्मचारीवर्गातील वयाची पंचेचाळीशी ओलांडलेला परंतु सर्वसाधारणरित्या किमान २ वर्षे सेवा शिल्लक असलेला कर्मचारी पात्र असेल.

| | | |
|---|---|---|
| वेतनगट तीन | - | वय वर्षे ४५ ते ५६ |
| वेतनगट चार | - | वय वर्षे ४५ ते ५८ |

५. **<u>कालमर्यादा :</u>**

नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्ती हवी असणारे तारमार्ग कर्मचारीवर्गातील कर्मचारी त्यांचे अर्ज, सक्षम अधिकाऱ्याने अधिसूचित केलेल्या कालमर्यादेत सादर करतील.

६. **<u>तारमार्ग कर्मचारीवर्गासाठी पर्याय/विकल्प :</u>**

उर्वरित सेवाकालावधीसाठी भरपाई घेणे किंवा त्याच्या मुलास कंपनीच्या सेवेत कंत्राटी तत्त्वावर रोजगारासाठी नामनिर्देश करणे असे पर्याय या योजनेनुसार नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्ती घेणाऱ्या तारमार्ग कर्मचारीवर्गातील कर्मचाऱ्यास उपलब्ध असतील.

६.१ **<u>भरपाई :</u>**

मुलगा नाही किंवा "वीज सेवक" म्हणून सेवेत येण्याची मुलाची इच्छा नाही अशा वेळी संबंधित कर्मचारी खालीलप्रमाणे भरपाई मिळण्यास पात्र असेल.

एक) पूर्ण केलेल्या सेवेच्या प्रत्येक वर्षासाठी ३५ दिवसांचे वेतन + सेवानिवृत्तीच्या सर्वसाधारण तारखेपर्यंत उर्वरित सेवेच्या वर्षांच्या प्रत्येक वर्षासाठी २५ दिवसांचे वेतन त्यास भरपाईदाखल मिळेल. (या प्रयोजनास्तव 'वेतन' याचा अर्थ फक्त मूळ वेतन + महागाई भत्ता असा राहील.)

दोन) वरील ६(एक) मध्ये नमूद केलेली भरपाईची रक्कम उर्वरित सेवेच्या कालावधीच्या एकूण वित्तलब्धीच्या रकमेपेक्षा जास्त होता कामा नये.

तीन) तथापि, भरपाईच्या निर्धारणाची एकूण जास्तीत जास्त रक्कम रु. ५ लाख इतकीच असेल.

६.२ **<u>"वीज सेवक" म्हणून नियुक्तीसाठी मुलाचे नामनिर्देशन करणे</u>**

वयाची पंचेचाळीशी ओलांडलेल्या व सेवानिवृत्तीची किमान २ वर्षे सेवा शिल्लक असलेल्या आणि नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्तीसाठी अर्ज सादर करणाऱ्या तारमार्ग कर्मचाऱ्यास त्यांच्या मुलाचे नामनिर्देशन कंत्राटी तत्त्वावर "वीज सेवक" म्हणून करण्यास परवानगी दिली जाईल.

## ७ <u>“वीज सेवक” म्हणून करावयाच्या नियुक्तीसाठी शैक्षणिक पात्रतेसंबंधी पूर्वावश्यकता</u>

**७.१** “वीज सेवक” म्हणून नियुक्ती होण्यासाठी किमान शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे राहील :

वीजतंत्री किंवा तारतंत्री व्यवसायात आय.टी.आय. उत्तीर्ण झाल्यानंतर राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे नॅशनल ट्रेड सर्टिफिकेट असणे आवश्यक

**<u>किंवा</u>**

शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ अन्वये, राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी पूर्ण झाल्यावर, राष्ट्रीय व्यवसाय शिक्षण परिषद, नवी दिल्ली कडून देण्यात येणारे वीजतंत्री/तारतंत्री या व्यवसायातील राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण प्रमाणपत्र असणे आवश्यक.

**<u>किंवा</u>**

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. “वीज सेवक” म्हणून २ वर्षे पूर्ण केल्यानंतर कंपनी त्यास आय.टी.आय. च्या प्रशिक्षणासाठी नामनिर्देशित करील.

**७.२** विद्युत अभियांत्रिकी विषयातील पदविका ही “वीज सेवक” पदासाठी उच्चतम अर्हता राहील.

**७.३** “वीज सेवक” म्हणून नियुक्ती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या अभियांत्रिकी पदवीधारक सोडून इतर पदवीधरांचाही विचार करण्यात येईल. परंतु अशा अर्जदारास उच्च पदावर दावा सांगण्याचा हक्क असणार नाही. तथापि, पूर्वावश्यकतांची पूर्तता ते करत असतील तर थेट सेवा प्रवेशाने उच्चतर पद भरतीच्या वेळी ते विभागीय उमेदवार म्हणून इतर उमेदवाराशी स्पर्धा करू शकतील.

## ८. नामनिर्देशित मुलासाठी <u>वयोमर्यादा</u>

**८.१** “वीज सेवक” पदावरील नियुक्तीसाठी तारमार्ग कर्मचाऱ्याच्या मुलाने वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली असली पाहिजेत. विहित तारखेस कमाल वयोमर्यादा ३० वर्षे अशी राहील. मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षेपर्यंत शिथिल केली जाईल.

## ९. <u>कंत्राटाचा कालावधी :</u>

**९.१** “वीज सेवक” म्हणून कंत्राटाचा कालावधी अर्हताधारक आणि अर्हतारहित उमेदवारांच्या बाबतीत पुढीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| **क)** | आयटीआय वीजतंत्री/तारतंत्री विषयक अर्हताधारक व विद्युत अभियांत्रिकी पदवीकाधारक उमेदवारांसाठी | ३ वर्षे |
| **ख)** | अर्हतारहित म्हणजे तांत्रिक अर्हता नसणाऱ्या परंतु एसएससी/एचएससी/ पदवी उत्तीर्ण उमेदवारांसाठी | ५ वर्षे |

१०. **सर्वसाधारण :**

१०.१ म.रा.विद्युत वितरण कंपनीत कोणतीही रिक्त पदे थेट सेवाप्रवेशाने भरावयाची असतील तेव्हा सेवा प्रवेश विनियमातील पूर्वावश्यकतेची पूर्तता करणाऱ्या पदवी/पदविका इत्यादी उच्च प्रकारची अर्हता धारण करणाऱ्या "वीज सेवक" पदावरील कर्मचाऱ्यांना उन्नतीची व आयुष्यमान सुधारण्याची संधी मिळावी म्हणून त्या पदांकरिता अर्ज करण्यास त्यांना पात्र समजण्यात येईल. परंतु थेट सेवाप्रवेशाद्वारे उच्च पदावर नियुक्ती देताना त्यांना कोणत्याही प्रकारे सवलतीचा लाभ मिळणार नाही. त्यांना विभागीय उमेदवार मानून अन्य उमेदवारांबरोबर स्पर्धेत उतरण्याची परवानगी देण्यात येईल.

१०.२ थेट सेवाप्रवेशाद्वारे सेवेत घेताना "वीज सेवक" म्हणून मिळविलेल्या त्यांच्या अनुभवाची योग्य ती दखल घेतली जाईल.

११. **"वीज सेवक" म्हणून करावयाच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती :**

"वीज सेवक" म्हणून करावयाच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती जोडपत्र - ख मध्ये दिल्याप्रमाणे असतील.

१२. **वीज सेवकाचे समावेशन :**

१२.१ प्रकरणपरत्वे ५ किंवा ३ वर्षे पूर्ण झाल्यावर कंत्राटाच्या कालावधीतील कामगिरी समाधानकारक असल्यास वीज सेवकास नियमित कनिष्ठ तंत्रज्ञ म्हणून समावेश करण्यात येईल.

१२.२ म.रा.वि.मंडळ कर्मचारी सेवाविनियमासोबतच्या अनुसूची दोन मध्ये नमूद केलेली विभागीय स्तराची निवड समिती वीज सेवकाचा नियमित कनिष्ठ तंत्रज्ञ म्हणून समावेश करण्याबाबत विचार करील.

१२.३ कंत्राटांतर्गत कालावधीतील कामगिरी लक्षात घेता, नियमित कनिष्ठ तंत्रज्ञ म्हणून समावेशन करण्यासाठी निवड समितीने त्याची निवड न केल्यास "वीज सेवक" म्हणून करण्यात आलेली कंत्राटी नेमणूक समाप्त करण्यात येईल.

१३. **नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्तीच्या/भरपाईच्या प्रकरणांच्या संस्करणाबाबत :**

१३.१ तारमार्ग कर्मचारीवर्गातील कर्मचाऱ्याने त्याच्या मुलास सेवेत घेण्याची मागणी न करता नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्तीचा पर्याय निवडल्यास या योजनेच्या कलम ६.१ अनुसार भरपाईपोटी त्यास अनुज्ञेय असणारी सर्व रक्कम नियत कालावधीपूर्व निवृत्तीसाठी त्यास कार्यमुक्त केल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या म्हणजे एक महिन्याच्या मुदतीत दिली जाईल. नुकसान भरपाईचा हा लाभ, विद्यमान म.रा.वि.वि.कं.म.च्या नियमानुसारच्या तरतुदीप्रमाणे त्यास मिळणाऱ्या अं.भ.नि.नि.नि, उपदान, ककुनियो, अर्जित रजेचे/अर्ध सरासरी रजेचे रोखीकरण इत्यादी संविधिक लाभांखेरीज, जास्तीचा मिळणारा लाभ असेल.

१४. **<u>शारीरिकदृष्टया अपात्र असूनही नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्तीचा पर्याय न देणाऱ्या तारमार्ग कर्मचाऱ्याच्या बाबतीत करावयाची कार्यवाही :</u>**

शारीरिकदृष्टया अपात्र असल्यामुळे सर्वसाधारण तांत्रिक कामे योग्यरित्या करू न शकणाऱ्या व या ना त्या कारणास्तव नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्तीचा पर्याय न स्वीकारणाऱ्या तारमार्ग कर्मचाऱ्याच्या बाबतीत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१४.१ वयाची ४५ वर्षे पूर्ण केलेल्या व त्यावरील वयाच्या तारमार्ग कर्मचाऱ्याने तारमार्गावर काम करण्यास खरोखरच अपात्र असूनही या योजनेनुसार नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्तीचा पर्याय स्वीकारीत नसल्यास अशा तारमार्ग कर्मचाऱ्याच्या अपात्रतेबाबतचा अहवाल उपविभागीय अधिकारी, विभागीय अधिकाऱ्यास पाठवील.

१४.२ असा अपात्रतेबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या अहवालाच्या आधारे नियुक्ती अधिकारी त्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार तारमार्ग कर्मचारीवर्गांतील अशा कर्मचाऱ्याचे प्रकरण परिच्छेद क्र.३.१.२ मध्ये विहित केलेल्या समितीसमोर सादर करील.

१४.३ उप विभागीय अधिकारी/विभागीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अहवालांवर परिच्छेद क्र.३.१.२ मध्ये विहीत केलेली समिती विचारविमर्श करील. वैद्यकीय कारणास्तव वारंवार घेतलेल्या रजा, रजेच्या अर्जासोबत जोडलेली वैद्यकीय प्रमाणपत्रे, गेल्या तीन वर्षातील वार्षिक गोपनीय अहवालातील शारीरिक स्वास्थ्याविषयीच्या रकान्यातील नोंदी, तारमार्ग कर्मचाऱ्याच्या शारीरिक अपात्रतेविषयी/काम करण्यातील असमर्थतेविषयी उपभोक्त्याकडून काही तक्रारी आल्या असल्यास त्या, अशा सर्व बाबीही समिती विचारात घेईल. आवश्यकता वाटल्यास समिती मुलाखतीही घेऊ शकेल.

१४.४ तारमार्ग कर्मचारीवर्गातील कर्मचारी खरोखरीच अपात्र असल्याचे अभिलेखाच्या आधारे, समितीचे मत झाल्यास समिती नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्तीसाठी त्या कर्मचाऱ्याच्या नावाची शिफारस करील आणि लागू असेल/पात्र असेल त्याप्रमाणे त्यास भरपाई दिली जाईल. समितीचा निर्णय त्या कर्मचाऱ्यावर बंधनकारक राहील.

१४.५ रजा मंजूर न करून घेताच सातत्याने गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्याची शिफारस पुन्हा पखरण करण्यासाठी/पर्यायी काम देण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत केली जाणार नाही. तसेच, अशा कर्मचाऱ्याविरुद्ध म.रा.वि.मंडळाच्या वर्तणूक व शिस्तविषयक नियमांनुसार कठोर कारवाई केली जाईल.

१५. **<u>विविध प्रयोजनांस्तव सक्षम अधिकारी</u>**

१५.१ या योजनेनुसार नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्ती देणे व कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती करणे या दोन्हीसाठी कार्यकारी संचालक (मा.सं) हे सक्षम अधिकारी असतील.

१५.२ विहित तारीख कार्यकारी संचालक (मा.सं) हे ठरवतील.

१५.३ या पर्यायाचा अवलंब करण्याची अंतिम तारीख कार्यकारी संचालक (मा.सं.) हे ठरवतील.

१५.४ योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठीच्या कोणत्याही प्रक्रिया ठरविणे, तसेच कर्मचाऱ्याने/मुलाने सादर करावयाची विविध प्रपत्रे आणि अर्ज यांचे स्वरूप ठरविणे याबाबतीत मुख्य महाव्यवस्थापक (क) आणि मुख्य विधी सल्लागार यांच्याशी विचारविनिमय करून कार्यकारी संचालक (मा.सं) हे अंतिम निर्णय घेतील.

१५.५ या योजनेसंबंधी कोणत्याही कर्मचाऱ्याने वाद निर्माण केल्यास किंवा याबाबत काही मतभेद झाल्यास कार्यकारी संचालक (मा.सं.) तो सोडवतील व त्यांचा निर्णय अंतिम राहील.

*********

**जोडपत्र - ख**

## **"वीज सेवक" पदासाठीच्या नियुक्तीच्या अटी आणि शर्ती**

**नियुक्ती :** शैक्षणिक अर्हता, वयाचा दाखला, जात प्रमाणपत्र इत्यादीच्या मूळ प्रमाणपत्रांची पडताळणी करून मगच नियुक्ती केली जाईल.

**वैद्यकीय प्रमाणपत्र :** "वीज सेवक" म्हणून रूजू होण्यापूर्वी उमेदवारास जिल्हा नागरी शल्यचिकित्सकाकडून स्वास्थ प्रमाणपत्र सादर करावे लागेल .

**चरित्र व पूर्वचारित्र्याची पडताळणी :** रूजू होताना "वीज सेवक" त्याच्या चरित्र व पूर्वचारित्र्याची पोलीस खात्याकडून पडताळणी करून घेण्याबाबतचे साक्षांकन प्रपत्र भरून देईल. पोलीस खात्याकडून त्याच्या चरित्राबाबत व पूर्वचारित्र्याबाबत समाधानकारक अहवाल मिळाल्यानंतर त्यास नियुक्त केले जाईल.

**एकत्रित पारिश्रमिक** : या योजनेनुसार कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती केलेल्या वीज सेवकास खालीलप्रमाणे एकत्रित पारिश्रमिक दिले जाईल.

| | | |
|---|---|---|
| पहिले वर्ष | - | दरमहा रुपये ४,५००/- |
| दुसरे वर्ष | - | दरमहा रुपये ५,०००/- |
| तिसरे वर्ष आणि पाच वर्षेपूर्ण होईपर्यंत | - | दरमहा रुपये ५,५००/- |

या व्यतिरीक्त कोणतेही अतिरिक्त भत्ते किंवा लाभ दिले जाणार नाहीत.

**मंजूर पद** : एकत्रित परिश्रमिक हे कनिष्ठ तंत्रज्ञाच्या मंजूर पदाच्या नावे/तारमार्ग कर्मचारीवर्गातील कर्मचाऱ्याच्या स्वेच्छानिवृत्तीच्या परिणामी होणाऱ्या रिक्त पदाच्या नावे काढले जाईल.

**मुदत** : वीज सेवक पदावरील नियुक्तीची मुदत प्रकरणपरत्वे ५ किंवा ३ वर्षाची राहील आणि त्याची परिगणना रूजू होण्याच्या तारखेपासून केली जाईल.

**करावयाची कामे :** सध्या कनिष्ठ तंत्रज्ञ करीत असलेली कामेच वीज सेवक करील.

**नेमणूक :** वीज सेवकाची नेमणूक मंडलांतर्गत कुठेही केली जाईल.

**मुख्यालयात राहणे :** वीज सेवकास सक्षम अधिकाऱ्याने निश्चित केलेल्या मुख्यालयात राहावे लागेल.

**प्रवास भत्ता :** कंपनीच्या कामासाठी वीज सेवकास जेव्हा मुख्यालयाबाहेर दौऱ्यावर जावे लागेल/प्रवास करावा लागेल तेव्हा कनिष्ठ तंत्रज्ञाला अनुज्ञेय असणारा प्रवास भत्ता मिळण्यास तो पात्र असेल.

**कामगिरीचे मूल्यामापन :** वीज सेवकाच्या कामगिरीचे मूल्यामापन दर वर्षी केले जाईल.

**कामात हयगय आणि चुका करणे** : कंपनीच्या नियमित आस्थापनेवरील कर्मचाऱ्यास वर्तणूक व शिस्तविषयक लागू असणारे नियम वीज सेवकासही बंधनकारक असतील. वीज सेवक म्हणून कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती केलेला कर्मचारी कामात कोणत्याही प्रकारची हयगय आणि चुका करताना आढळल्यास त्याची कंत्राटी तत्त्वावरील नियुक्ती रद्द होईल.

**रजा :** कॅलेंडर वर्षात मिळणाऱ्या १५ नैमित्तिक रजांव्यतिरिक्त कोणतीही रजा मिळण्यास तो पात्र असणार नाही. पहिल्या वर्षी यथा प्रमाण तत्त्वावर नैमित्तिक रजा घेण्यास तो पात्र असेल. तसेच कामावर असताना झालेल्या अपघाताच्या परिणामी विकलांगता आलेल्या कालावधीसाठी म.रा.वि.वि.कं.मर्यादितच्या नियमांनुसार अनुज्ञेय असेल त्याप्रमाणे विशेष विकलांगता रजा मिळण्यासही तो पात्र ठरेल.

**वैद्यकीय सुविधा :** कामावर असताना त्यास धक्काबुक्की झाल्यास आणि अपघात झाल्यास वैद्यकीय खर्चाची संपूर्ण रक्कम परत मिळण्यास तो पात्र असेल.

**श्रमिक भरपाई : अधिनियमांतर्गत भरपाई** श्रमिक भरपाई अधिनियमानुसार अनुज्ञेय भरपाई मिळण्यास तो पात्र असेल.

**कनिष्ठ तंत्रज्ञ : म्हणून समावेशन** वीज सेवकाचे कनिष्ठ तंत्रज्ञ म्हणून समावेशन, त्याची कंत्राटांतर्गत कालावधीतील त्याच्या कामगिरीच्या समाधानकारकतेवर अवलंबून राहील.

**सेवा समाप्तीचे लाभ :** उपदानाच्या प्रयोजनार्थ किंवा सेवानिवृत्त होताना मिळणाऱ्या अन्य लाभांच्या प्रयोजनार्थ एकत्रित पारिश्रमिक पद्धतीने वीज सेवक म्हणून केलेली सेवा विचारात घेतली जाणार नाही.

**अन्य लाभ :** म.रा.वि.वि.कं.मर्यादितच्या अनुज्ञेय नियमांनुसार नावाचा बिल्ला व गणवेष मिळण्यास वीज सेवक पात्र असेल. प्राणांतिक अपघाताच्या प्रकरणात त्याच्या अवलंबिताचा विचार सुधारपत्र क्रमांक २८ मधील तरतुदींनुसार केला जाईल.

********

**जोडपत्र - ग**

# नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्ती - २००८ करिता अर्ज

१. कर्मचा-याचे नाव : श्री./श्रीमती/कुमारी ________ ________ ________
आडनांव पहिले नाव मधले नाव

२. पदनाम : ____________________

३. अं.भ.नि.नि.क्र. : | | | | | | | | |

४. जन्म तारीख : ________ ________ ________
तारीख महिना वर्ष

५. मराविमंडळात रूजू होण्याची तारीख : ________ ________ ________
तारीख महिना वर्ष

६. कामाचे सध्याचे ठिकाण : उपविभाग ________
विभाग ________
मंडल ________
परिमंडल ________

७. सेवानिवृत्तीची तारीख : ________ ________ ________
तारीख महिना वर्ष

८. पर्याय सादर केल्याच्या तारखेस असलेले वय : ______ वर्षे ______ महिने

९. उर्वरित सेवेची एकूण वर्षे : ______ वर्ष/वर्षे ______ महिने

१०. विद्यमान मूळ वेतन : रू. ________

११. शिस्तभंगविषयक कारवाई प्रलंबित आहे का ? "होय" असे उत्तर असल्यास तपशील द्यावा : होय / नाही
: ____________________

१२. नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्ती घेण्याचे कारण : ____________________

१३. नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्ती योजनेनुसार मुलास नोकरी हवी आहे का ? "होय" असे उत्तर असल्यास : होय / नाही

क) मुलाचे नाव : श्री. ________ ________ ________
आडनांव पहिले नाव मधले नाव

ख) शैक्षणिक अर्हता : ____________________

ग) जन्मतारीख : ________ ________ ________
तारीख महिना वर्ष

घ) नियत कालावधीपूर्व सेवानिवत्ती योजनेचापर्याय सादर केल्याच्या तारेखस असलेले वय : ______ वर्षे ______ महिने

खाली सही करणारा मी, श्री./श्रीमती/कुमारी ____________________________ याद्वारे असे घोषित करीत आहे की वर नमूद केलेली माहिती माझ्या समजुतीनुसार खरी आहे आणि नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्तीसाठीचा अर्ज मी माझ्या स्वत:च्या इच्छेने सादर केला आहे.

तसेच मी हे ही घोषित करीत आहे की प्रशासकीय परिपत्रक क्र.१६३ दि.०४.०८.२००८ नुसार लागू केलेली **नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्ती योजना** मी वाचली असून त्यातील आशय मी समजून घेतला आहे व त्यात विनिर्देशिलेल्या अटी आणि शर्ती मी स्वीकारित आहे.

सेवा समाप्तीवेळच्या माझ्या लाभांतून सानुग्रह अनुदानासहित सर्व अग्रिम/थकित रकमांच्या वसुलीचे/समायोजनाचे अधिकार मी याद्वारे कंपनीस देत आहे.

**तारीख :**

**ठिकाण :**

कर्मचाऱ्याची सही

**( नाव :** )

---

## केवळ कार्यालयीन उपयोगासाठी

(सेवेच्या तपशीलाची पडताळणी किमान कार्यकारी अभियंता व त्यावरील स्तराच्या अधिकाऱ्याने करावी.)

रकाना क्र.१ ते क्र.१३ मध्ये नमूद केलेला तपशील सेवा पुस्तिकेच्या आधारे पडताळून पाहिला असून तो बरोबर असल्याचे आढळल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता